# जिल्हा परिषद सोलापूर

## दरपत्रक सूचना क्रमांक/शिक्षण/२०२३-२४ (ऑफलाईन)

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जय भारत प्राथमिक शाळेसाठी बेंच खरेदीसाठी मान्यताप्राप्त पुरवठादाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित निविदा र.रु. | निविदा फार्म फी | बयाणा रक्कम | एकूण सुरक्षा ठेव रक्कम | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जय भारत प्राथमिक शाळेसाठी बेंच पुरविणे बाबत | ४,८०,०००/- | ५००/- | १००००/- | २% (रू.९६००) | अधिकृत/ मान्यताप्राप्त विक्रेता असावा |

१) सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया दरपत्रकाद्वारे ऑफलाईन पध्दतीने होईल. सदर निविदेसंदर्भात निविदा, प्रसिध्दी सुचना, अटी व शर्ती व शुध्दीपत्रके इ. https://zpsolapur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२) ऑफलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्रं.१ तांत्रिक लिफाफा व निविदा धारकांचा लिफाफा क्रं.२ उघडणेचा दि. ४ /३ /२०२४ रोजी ३.०० वाजता व त्यानंतर कार्यालयीन सोयीच्या वेळी मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षण विभाग, जि.प.सोलापूर यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.

३) वरील कामाचे दरपत्रके दि. २८/ २ /२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दि. १ / ३ /२०२४ रोजी ५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचा दिवस वगळून) ऑफलाईन पध्दतीने समक्ष सादर करता येतील.

४) अटी व शर्ती https://zpsolapur.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या निविदा मध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची निविदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

**स्थळ प्रतीवर मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरी असे**

**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

## प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर सन २०२३-२४
## स्टेशनरी ई -निविदा अटी व शर्ती

१) सदरची निविदा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी असणा-या मान्यताप्राप्त पुरवठाधारक यांनी भरावी.

**अ) तांत्रिक निविदा लिफाफा :** (खालील कागदपत्रे तांत्रिक निविदा लिफाफयामध्ये सादर करणे आवश्यक आहे.)

| | |
|---|---|
| १) | शॉपअॅक्ट लायसन्स |
| २) | निविदा फी भरलेले चलनपत्र |
| ३) | बयाणा रक्कम भरलेले चलनपत्र |
| ४) | पॅनकार्ड |
| ५) | GST नोंदणी प्रमाणपत्र |

**टीप -** तंत्रिक लिफाफ्यात जी प्रमाणपत्रे सादर केली असतील ती साक्षांकित केली असणे आवश्यक आहे.

**ब) व्यापारी दरासंबंधीचा लिफाफा :** सदर लिफाफयामध्ये निविदाकाराने सर्वसमाविहित दर दर्शविणारी विहित निविदा प्रपत्रामधील सादर करावी.

१) ऑफलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्रं.१ तांत्रिक लिफाफा व निविदा धारकांचा लिफाफा क्रं.२ उघडणेचा दि ४ /३ /२०२४ रोजी १५.०० वाजता व त्यानंतर कार्यालयीन सोयीच्या वेळी मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग, जि.प.सोलापूर यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.

२) निविदा बयाणा रक्कमेपोटी रककम रू.१०,०००/- इतकी रक्कम विहीत पध्दतीने भरणा करून online bank confirmation ची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

३) पुरवठा करावयाच्या साहित्यावरील सर्व प्रकारचे वस्तु व सेवा कर, प्राप्तीकर, इतर कर या सर्व बाबी विचारात घेवून साहित्याचे दर नमुद करावेत नंतर दराबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४) व्यापारी दराबाबतचा लिफाफा भरताना दिलेल्या वस्तूचे दर सादर करणे बंधनकारक राहील. परंतु सर्वच वस्तू खरेदी करणे कार्यालयावर बंधनकारक असणार नाही.

५) सूक्ष्म व लघु,मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ अन्वये निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यास सूट घ्यावयाची असल्यास पुरवठादाराने सदर सुट या निविदेसह लागू असलेचे सक्षम उदयोग अधिकारी यांचे प्रमाणपत्र नोंदणी प्रमाणपत्रसह जोडावे.

६) सदर साहित्य सामुग्रीचा पुरवठा हा जिल्हा परिषदेच्या आवश्यकतेनुसार जय भारत प्राथमिक शाळा१२३, स्लॉटर हाऊस, झोपडपट्टी, उत्तर सदर बझार, सोलापूर येथे स्वखर्चाने अथवा सोलापूरात सांगेल त्या ठिकाणी पोहोच दयावी लागेल.

७) निविदाकार हा स्वत: वस्तुंचा मुळ उत्पादक किंवा मुळ उत्पादकाचा अधिकृत विक्रेता असावा. त्याचे स्वत: चा सोलापूर जिल्हयात दुकान अथवा व्यवसाय असावा.

८) पुरवठा केलेल्या साहित्यासाठी वाहन भाडे अथवा हमाली असे कोणतेही अतिरिक्त खर्च इकडील कार्यालयाकडून देण्यात येणार नाहीत.

९) निविदाकारानी कोणतीही अट घालु नये अट घातलेल्या निविदेबाबत विचार केला जाणार नाही.

१०) निविदेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड नसावी. चुकून खाडाखोड /बदल केल्यास त्या ठिकाणी निविदा धारकाची सही व शिक्का आवश्यक आहे. स्वाक्षरी न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

११) साहित्य पुरवठा करताना सदर साहित्य हे नमुना दाखल सादर करण्यात आलेल्या प्रमाणेच केले पाहिजे. हलक्या अथवा कमी प्रतीचे साहित्य स्विकारले जाणार नाही व वरील अटीचे भंग केल्यास पुरवठाधारकाचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

१२) पुरवठा केलेल्या साहित्याच्या दर्जा संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास चौकशी करून तक्रारीचा निर्णय झाल्यावर देयक अदा केले जाईल.

१३) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

१४) स्वीकृत निविदाधारकांनी निविदा रक्कमेच्या २% सुरक्षा रक्कम करार करण्यापूर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खाते क्रमांक 35155850780 वर तीन दिवसाच्या आत चलनाव्दारे भरावी व चलनाची एक प्रत या कार्यालयास समक्ष सादर करावी.

१५) स्वीकृत निविदाधारकाच्या मंजूर बिलातून आयकर अधिनियम १९६१ नुसार आयकर तसेच वस्तू व सेवा कर वजावट करण्यात येईल.

१६) स्वीकृत निविदाधारकांनी सदरचे काम अर्धवट सोडले तर ते काम इतर ठेकेदाराकडून करून घेण्यात येईल व फरकाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल केली जाईल.

१७) सदर खरेदी ही शासन निर्णय उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक -भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या अनुसार प्रस्तावित करण्यात येत असून त्यानुसारचे सर्व अटी व शर्ती या खरेदीस लागू असतील तसेच उदयोग व ऊर्जा विभागाकडील २४ ऑगस्ट २०१७ चा शासन निर्णय या खरेदीस लागू राहील.

१८) पुरवठादारास कोणत्याही प्रकारची अग्रिम देण्यात येणार नाही.

१९) मंजूर केलेल्या निविदेपोटी भरणा केलेली बयाणा रक्कम व अनामत रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यानंतर निविदे कामाबाबत कोणतीही तक्रार नाही याची खात्री करून परत करण्यात येईल तसेच ना मंजूर निविदेपोटी भरणा केलेली बयाणा रककम मागणी अर्ज सादर केले नंतर एक महिन्या नंतर परत केली जाईल.

२०) स्वीकृत दर निविदाधारकाच्या कार्यारंभ आदेशापासून एक वर्षापर्यंत बंधनकारक राहतील. तथापि GST प्रणालीनुसार दरामध्ये बदल करणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीत प्राधिका-यांना राहतील.

२१) तांत्रिक निविदेचा लिफाफा व व्यापारी /दरासंबंधीचा लिफाफा यातील व निविदेच्या शर्ती व अटीतील कोणतीही अट शिथील करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांचेकडे राहील.

२२) निविदा स्विकृतपुर्वी आवश्यकता असल्यास प्राप्त दर व GEM(Government E Market) पोर्टलवरील सदर वस्तुचे दराबाबत तडजोडीसाठी (निगोसीशेन) बैठक घेण्यात येईल, तडजोडीअंती निश्चित झालेल्या दरांना मंजुरी देण्यात येईल.

**स्थळ प्रतीवर मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरी असे**

**शिक्षणाधिकारी(प्राथ)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**